(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**June -2020**

**ISSUE No-CCXXXV(235)**




Prof. Virag.S.Gawande
**Chief Editor :**
Director
Aadhar Social Research &,
Development Training Institute,
Amravati.

Dr. R.S.Satbhai
**Executive Editor**
Local Secretary
**Adv.B.D.Hambarde** Mahavidyalaya
Ashti

**Guest Editor**

Dr. S.R.Nimbore
**Principal**
**Adv.B.D.Hambarde**
Mahavidyalaya Ashti

Dr. Satish Kadam
**President,AMIP&**
Head,Dept of History
YCM,Tuljapur

Dr. Shivraj Bokade
**Secretary,AMIP&**
Head,Dept of History
YC,Nanded

**The Journal is indexed in:**
Scientific Journal Impact Factor (SJIF)
International Impact Factor Services (IIFS)

| | | |
|---|---|---|
| 104 | शोषणमुक्त, समतायुक्त व राष्ट्रनिष्ठ समाजनिर्मितीसाठी लढणारे महापुरुष - डॉ.बाबासाहेब आंबेडकर — डॉ.संतोष सुधाकरराव कोटुरवार | 476 |
| 105 | तेर : प्राचीनातून नाशाकडे — डॉ.विनोद बाबुराव बोरसे | 479 |
| 106 | प्राचीन मराठवाड्यातील (धर्मपूर) धर्मापुरी एक वैभवशाली नगर,बाजारपेठ आणि धार्मिक व सांस्कृतिक केंद्र — डॉ.गंगथडे आर.डी. | 486 |
| 107 | देवगिरी किल्ला : मराठवाड्यातील ऐतिहासिक वारसा — डॉ.केशव अंबादास लहाने | 489 |
| 108 | कोविड १९ महामारीतील आहाराचे आयोजन — प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे | 497 |
| 109 | महात्मा गांधीजींच्या रचनात्मक कार्याची कर्मभूमी – सेवाग्राम आश्रम — डॉ.स्मिता म. जाधव | 501 |
| 110 | मराठवाड्यातील गढी/वाड्यातील: जलव्यवस्थापन — *प्रा. डॉ. डी. एस. बिराजदार* | 508 |
| 111 | दारिद्रय निमूर्लनामध्ये सामाजिक सुरक्षा उपायांच्या भूमिकेबद्दल डॉ. अमर्त्य सेन यांचे विचार — प्रा. चंद्रशेखर फरकाडे | 513 |
| 112 | हरिहरराव देशपांडे यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान — प्रा.डॉ.गोविंद तिरमनवार | 519 |
| 113 | बदलत्या वातावरणामुळे हवामानातील झालेले परिणाम — प्रा.डॉ.सोमनाथ गुंजकर | 527 |
| 114 | साहित्य आणि चित्रपट : विशेष संदर्भ – नारायण हरी आपटे — प्रा.हमीद उमरअली काझी | 526 |
| 115 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार — डॉ.जाधव राजेश्री अप्पाराव | 532 |
| 116 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्य — प्रा. जयंत विरुळकर | 537 |
| 117 | महात्मा गांधीजींच्या चळवळीतील मागण्यांचा स्वातंत्र्य चळवळीवर प्रभाव : एक अभ्यास — प्रा. जयवंत नथ्थूजी काकडे | 543 |
| 118 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य — श्री. अजितकुमार भिमराव पाटील | 548 |
| 119 | भारतीय स्वातंत्र्य लढयात चंद्रपुरचे सिंह खुशालचंद खजांची यांचे योगदान — प्रा.डॉ.कैलास रामचंद्र भांडारकर | 552 |
| 120 | चार्वाक दर्शन : एक विचारप्रवाह — डॉ. किरण शिवाजीराव पाईकराव | 556 |
| 121 | उस्मानाबाद तालुक्यातील गोरक्षणदर्शक वीरगळ : समकालीन शेतीप्रधान समाजव्यवस्थेचे निदर्शक — प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री रमेश | 560 |
| 122 | हैद्राबाद मुक्तिसंग्रामात सोलापूरच्या आर्य समाजाने दिलेला ऐतिहासिक लढा — प्रा. लक्ष्मी मधुकर रेड्डी | 566 |
| 123 | चिनी बौद्ध प्रवासी – चर्चा आणि चिकित्सा — प्रा. डॉ. माधवी खरात | 571 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

# उस्मानाबाद तालुक्यातील गोरक्षणदर्शक वीरगळ : समकालीन शेतीप्रधान समाजव्यवस्थेचे निदर्शक

प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री रमेश
इतिहास विभाग प्रमुख, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद (महाराष्ट्र)

**प्रस्तावना** महाराष्ट्रातील मराठवाडा हा प्रादेशिक विभाग स्वातंत्र्योत्तर काळातील औद्योगिकरणाच्या वेगवान प्रक्रियेत तुलनेने मागे असल्याने या विभागास मागासलेपणाचे लेबल लावले जाते. शिवाय मराठवाडयाचा बहुताश भाग हा किमान वर्षा प्रमाणाचा असल्याने शेतीच्या मागासलेपणाचा किंवा कमी उत्पादकतेचा शिक्काही मारला जातो. पण मध्ययुगापासूनचा मराठवाडयाचा इतिहास पाहिला तर, मराठवाडयात शेतीप्रवण क्षेत्र, जमिनीची सुपिकता याचे प्रमाण मोठया प्रमाणात असल्याचे दिसते आणि शेतीपूरक व्यवसाय म्हणुन पशुपालनास त्यातही दुग्धव्यवसायाकरिता आणि शेतीकामासाठी आवश्यक वृषभ (बैल) पुरवठयासाठी म्हणुन गोपालनास प्राधान्य दिलेले दिसते. यासंदर्भातील लिखितपेक्षा भौतिक पुरावे मराठवडयात जागोजागी आढळतात.

मराठवाडयातील प्रदीर्घ ऐतिहासिक परपरा लाभलेल्या उस्मानाबाद परिसराचा वरील संदर्भाने अभ्यास करीत असताना या परिसरातील विपूल प्रमाणातील वीरगळ या अभ्यासास व त्यातील निष्कर्षास सबळ पुरावा देतात. येथे सापडणाऱ्या १६ ते १९ व्या शतकातील वीरगळांमध्ये गोरक्षणदर्शक व गोसवर्धनदर्शक वीरगळ बहुताश प्रमाणात आढळतात. त्या उस्मानाबाद परिसरातील शेतीप्रधान समाजव्यवस्थेचे निदर्शक ठरतात.

**उद्देश** १) उस्मानाबाद तालुक्यातील वीरगळांच्या विविधतेचा अभ्यास करणे.
२) उस्मानाबाद तालुक्यातील गोरक्षणदर्शक वीरगळाचा अन्वयार्थ पडताळून पहाणे.
३) वीरगळांविषयीचा स्थानिकांचा गैरसमज दूर करून त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे, वीरगळामागील संकल्पना, समयोचितता, उद्देश व भूमिका स्पष्ट करणे.

**संशोधन पध्दती**: क्षेत्रसर्वेक्षण, चर्चा, मुलाखती, संदर्भग्रंथ—साधनांचा वापर, वस्तुसंग्रहालयास भेटी, छायाचित्रण.

**विषय मांडणी** :— उस्मानाबाद तालुक्यातील वीरगळांचा अभ्यास लघुसंशोधन प्रकल्पाच्यारूपाने करण्यासाठी परिसरात क्षेत्रसर्वेक्षण करीत असताना एक गोष्ट लक्षात आली, की या भागात वीरगळाचे प्रमाण व वैविध्य विपुल प्रमाणात असून त्यामध्ये गोरक्षणदर्शक/ गोसवर्धनदर्शक वीरगळांचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. हे लक्षात आल्यावर त्यामागील कारणमिमासा करण्याचा प्रयत्न केला, तो या शोधनिबधात माडत आहे.

## वीरगळ : संकल्पना, व्याख्या, स्वरूप आणि प्रकार

अर्थ व व्याख्या — वीरगळांची रचना भारतात फार प्राचीन काळापासून केली गेलेली दिसते. वीरगळ म्हणजे वीर पुरूषाच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला दगडाचा, क्वचित लाकडाचा स्तंभ होय, असा ढोबळ मानाने अर्थ सागता येतो. महाराष्ट्रात जुन्या मंदिराच्या विशेषत महादेव मंदिराच्या बाहेर या वीरगळ आढळतात. या वीरगळांची निर्मिती केवळ युध्दात मरण पावलेल्या

ISSN : 2278-9308
June 2020

शूरवीरांचे स्मारक म्हणून केली गेलेली नसून गावातील लोकांचे पशुधनाचे संकटापासून रक्षण करताना वीरगतीस प्राप्त झालेल्या वीराचे स्मारक म्हणूनही केली गेलेली दिसते

**वीरगळ (Hero Stone)** किंवा वीर कल्लु म्हणजेच वीराचा दगड यातील वीर हा शब्द संस्कृत असून त्याचा अर्थ योध्दा किंवा मोठया माणसांनी मरणोत्तर दशा असा होतो. तर कल्लु हा शब्द कानडी असून त्याचा अर्थ शिल्प अथवा शीळा असा होतो. मल्याळी भाषेत वीरगळास तर्रा, कानडीमध्ये कल्लू, तर उत्तर भारतात वीरब्रहम असे म्हटले जाते. शब्द वेगळे असले तरी त्यांच्या निर्मिती मागील कल्पना, उद्देश साधारणत: एकच असलेले दिसतात. वीरगळ हा शब्द वीरपूजेचे प्रतिक म्हणून वापरला जातो. पण वीरगळांवर काहीही लिहलेले नसल्याने त्यांच्या निर्मिती व उददेशाविषयी निश्चित कल्पना येत नाही. परिणामी वीरगळाविषयीच्या वेगवेगळया कल्पना जनमानसामध्ये प्रचलित असलेल्या दिसतात. काहीवेळा क्रुर किंवा उग्र प्रवृत्तीच्या यक्ष श्रेणीतील ग्रामदैवतांचे स्वरूप मानून त्यांच्याविषयी भीतीची भावनाही प्रसारीत झालेली दिसते. वीर या शब्दाचा असा दोन्ही परीने अर्थ लावून पुरूषवीरासाठी नरसिंग, झोटिंग, नेडा, वेताळ, म्हसोबा, मंजु, भैरव, तर स्त्रीवीरांसाठी यमाई, तुकाई, मायराणी, जाखमाता इ. शब्द वापरले जातात.[3] भारतातील अभिजात साहित्यामधून प्राचीन काळापासूनच राष्ट्ररक्षणार्थ वीरमरण पत्करलेल्या वीरांची, त्यांच्या कार्यांची वर्णने आपणास वाचावयास मिळतात. वीररसाची, वीरधर्माची कल्पना साहित्यातून ज्याप्रमाणे वीरकाव्याच्या रूपाने प्रकटते, त्याप्रमाणे शिलालेखाव्दारे हीच कल्पना वीरगळ रूपात प्रकटते, असे दिसते

वीरगळास वेगवेगळया काळात, वेगवेगळया भाषामधे विविध संज्ञानी उल्लेखिलेले दिसते. कानडीमधे कल्लू किंवा वीरकल्लू, महाराष्ट्रात वीरगळ, केरळमधे(मल्याळम भाषेत) तर्रा, उत्तर भारतात वीरब्रह्म, गोंडवनात शिणोली, गुजरातमधे पालिया हे व असे नामोल्लेख वीरगळाच्या बाबतीत पहावयास मिळतात. हे नामोल्लेख वेगवेगळे असले, तरी त्यामागील अर्थ, हेतू, संकल्पना एकच असते. आधुनिक काळात वीरगळांचा अभ्यास व संशोधन करणाऱ्या अभ्यासकांनी वीरगळांच्या समर्पक/सर्वसमावेशक व्याख्या करावयाचा प्रयत्न केला आहे. त्याच व्याख्यामधून वीरगळ संकल्पना व अर्थ आणखी चागल्याप्रकारे स्पष्ट होतो. मृत पावलेल्या वीराची पूजा व स्मरण करण्याच्या हेतूने वीरगळ निर्मिती सुरू झाली हे त्यावरून कळते. युध्दात किंवा एखाद्या साहसी कृत्यात धारातिर्थी पडलेल्या पराक्रमी शुरविराच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारलेला दगड, लाकडी ठोकळे, अवाढव्य स्मृतीप्रित्यर्थ उभारलेला दगड, लाकडी ठोकळे, अवाढव्य पाषाणखंड किंवा शिल्पकृतीनी या वीराची बलिदानगाथा साकारलेल्या दगडांना वीरगळ म्हणतात

संस्कृत साहित्यामध्ये महाकाव्यामधून विशेष कार्य करून मरण पावलेल्या वीराचे वर्णन केलेले आढळते. वीरधर्माची कल्पना साहित्यामधून वीरकाव्य नावाने वर्णिलेली आढळते, तर शिलालेखाव्दारे हीच कल्पना वीरगळ नावाने स्पष्ट केलेली दिसते. हॉपकिन्स या पाश्चात्य तज्ञाने, रणांगणावर लढता लढता जो वीरमरण स्वीकारतो व तो यक्ष लोकांचा एक भाग बनतो, त्याचे वीरगळ तयार केले जाते. असे वक्तव्य वीरगळाच्या निर्मितीबाबत केले आहे. वीरगळांचा संबंध वीरपूजेशी असल्याने शूर पुरूषांच्या स्मारकशिळा म्हणजे वीरगळ अशीही व्याख्या केली जाते. प्राचीन भारतीय अभिजात साहित्य व ग्रंथामधून वीरगळांबाबत आलेल्या उल्लेखावरून असे लक्षात येते की, जो युध्दामध्ये शौर्य व पराक्रम गाजविताना मरण पावलेला असतो, त्याचे मृत्युनतरचे जग कसे असेल, याबाबतच्या कल्पनेवर आधारित वीरगळाची निर्मिती झालेली दिसते. मृत्युनं जो यक्षलोकी पोहचलेला असतो, तो शस्त्राने मरण पावलेला शूरवीर असतो, अशी वीरगळाची व्याख्या महाभारतात केलेली आढळते. श्रीमद्भगवद्गीतेतही कुरूक्षेत्रावरील अंतिम युध्दप्रसंगी भगवान श्रीकृष्ण आप्तांच्या विरोधात शस्त्रे ठेवलेल्या अर्जुनास युध्दास प्रवृत्त करताना म्हणतात

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - ((SJIF) -7.675,
Issue No,235

ISSN : 2278-9308
June 2020

की, युध्दात मरण पावलास तर तुला स्वर्गप्राप्ती होईल आणि जर विजय प्राप्त झाला तर पृथ्वीचे राज्य उपभोगायला मिळेल.(हतो वा प्राप्स्यसि स्वर्ग, जित्वा वा भोक्ष्यसे महीम!)* तर शुक्रनितीसार ग्रंथामध्ये योगमुक्त संन्यासी व रणांगणात शत्रूच्या डोळयांशी डोळे व छातीशी छाती भिडवून संग्राम करीत असताना मृत्यू पत्करणारा वीर, हे दोघेच परमगतीला जाणारे पुरूष आहेत, असे म्हटले आहे. थोडक्यात देव, देश आणि धर्मासाठी प्राणाचे बलिदान करणाऱ्या व्यक्तीस सर्व कर्मातून मुक्तता मिळून स्वर्गात जागा मिळते अशी कल्पना थोडयाफार फरकाने सर्वकालीन भारतीय धर्मग्रंथात मांडलेली दिसते. वस्तुनिष्ठदृष्टया विचार केल्यास असे दिसते की, यामागे राष्ट्र / राज्य / समाज / भूमि / पशु रक्षणार्थ वेळ पडल्यास प्राणही देण्यासाठी प्रेरणा देण्याची भूमिका आहे. या भूमिकेचे उदात्तीकरण सतीशिळेमागेही असलेले दिसते. श्री विजय आपटे वीरगळांविषयी म्हणतात की, समाजात वेळोवेळी होऊन गेलेले लोकोत्तर पुरूष देवत्व पावले. बलिदान, हौतात्म्य अथवा विशिष्ट ध्येयासाठी स्वीकारलेले मरण यांना मानवी इतिहासात आदिकाळापासूनच विशेष महत्व प्राप्त झाले आहे. तसे मरण स्वीकारणाऱ्या व्यक्तींना समाजाने देव मानले आणि त्यांच्या दगडी प्रतिमा स्थापन केल्या त्यांना वीरगळ असे नाव होते.

इ.स. दुसरे शतक ते इ.स. १६–१७ वे शतक हा बहुसंख्य वीरगळांच्या निर्मितीचा साधारण कालखंड म्हणता येईल. त्या–त्या काळात वीरगळ व सतीगळांच्या निर्मितीमागील परिस्थिती, रचना वेगवेगळी असेलही पण कल्पना मात्र एकच होती ती म्हणजे एखाद्या शौर्यमरण / वीरमरण पत्करलेल्या व्यक्तीचे स्मरण आणि भविष्यातील युवा पिढयांना राष्ट्ररक्षणाची मिळणारी प्रेरणा! (कारण मोक्ष, पुण्यातुन स्वर्गप्राप्ती या कल्पनांना भारतीय समाजात खूप महत्व होते. त्यासाठी लोक आपला जीव देण्यासही मागे–पुढे पहात नसत.) शिवाय शूर–पराक्रमी व्यक्तीसाठीच नव्हे, तर सामाजिक, धार्मिक हिताचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व मानवाचे जीवन सुखी करणाऱ्या कष्टाळू प्राण्यांची आठवण जतन करण्याची पध्दतही होय. त्यांच्या कार्याची पावती, मरणोत्तर पुरस्कार होय. अशाप्रकारे विविध कारणांनी उभारल्या जाणाऱ्या वीरगळांचे विविध प्रकार पहावयास मिळतात व त्या नुसार त्यांची विविध रूपेही पहावयास मिळतात.

**वीरगळांचे स्वरूप व प्रकार –**

जास्त करून बेसाल्ट दगडामध्ये घडवलेल्या वीरगळी प्रदेशानुरूप कमी जास्त उंचीच्या उभट आयताकृती शिळेवर सहसा तीन टप्प्यात कोरलेल्या असतात. काहीवेळा त्यात चार किंवा कर्नाटक, आंध्रासारख्या प्रदेशात त्याहीपेक्षा जास्त कप्पे / टप्पे आढळतात. सर्वात खालच्या थरात त्या वीराचे वेगवेगळया पध्दतीने मरण दाखविलेले असते. कधी तो द्वंद्व करताना, कधी भालायुध्द, कधी अश्वावरून युध्द, कधी गजावरून युध्द करताना, तर कधी गाय–गुरे रक्षण करताना चित्रित केलेले असते. त्याच्या वरच्या कप्प्यात त्या वीराचे स्वर्गारोहण दर्शविलेले असते. म्हणजे काही अप्सरा त्याला हाताला धरून अथवा पालखीतून सन्मानाने स्वर्गात नेत असलेले चित्रांकन असते. त्याच्या वरच्या कप्प्यात तो वीर शिवलिंगाचे पूजन करत असल्याचे शिल्पांकन केलेले असते. क्वचित प्रसंगी त्या वीराच्या ईष्ट देवतेचे पूजन करत असतानाचे चित्रण असते. उदा. काही वीरगळांमध्ये तो वीर विष्णु, देवी, गणपती, जैन तिर्थंकर यांचे पूजन करीत असताना दिसतो. पण बहुतांश वीरगळामध्ये शिवपूजनच दर्शविलेले दिसते. कारण प्राचीन काळापासून शिवपूजा विविध रूपात होत आली आहे. सिंधु संस्कृतीपासून ते मध्ययुगापर्यंत रूद्र, पशुपती, शिवलिंग, शिवप्रतिमा / मुर्तीरूपात शिवपूजा सार्वत्रिक होत असलेली दिसते. सर्वमान्य असलेल्या शिवाला आराध्य मानून त्यांची प्रतिमा वीरगळांच्या या तिसऱ्या टप्प्यात कोरलेली दिसते. महाराष्ट्रातही बऱ्याच भागात प्रदीर्घ काळापासून शिवपूजन सार्वत्रिक झालेले दिसते. सातवाहन व उत्तरकालीन राजे तसेच सातवाहनांचे समकालीन उत्तर हिंदुस्थानी

सम्राट कुशाणांच्या नाण्यावर शंकराची प्रतिमा आढळते'' थोडक्यात प्रदीर्घ कालापासून शिव हा बहुजन समाजाचा देव होता आणि प्राचीन द्रष्ट्यांनी योजिलेल्या आर्यीकरणाच्या मध्यंतरात त्याला व त्याच्या अनुयायांना शिष्ट दैवतात व समाजात स्थान मिळालेले असावे'' त्यानेच परिवर्तन वीरगळातील शिवपूजनात झालेले असावे असे वाटते. वीरगळाच्या या तीन टप्प्याच्या वर त्रिकोणाकृती भागात चंद्र–सुर्य दाखविलेले असतात. याचा अर्थ ''यावच्चन्द्रौ दिवाकरौ'' म्हणजे जोपर्यंत चंद्र सुर्य आहेत तोपर्यंत या वीराची किर्ती टिकून राहील. एकंदर रणांगणावर वा देश–समाजहितार्थ धाराशयी पडलेल्या या विदेही वीराला अप्सरा सन्मानाने शिवलोकात नेताहेत आणि तो चिरकाल शिवलोकात वास करीत आहे. त्याची किर्तीही चिरकाल समाजमनात वसत आहे, असा या शिल्पकथेचा अर्थ आहे. चौकोनाची संख्या त्यावरील व्यक्तीचित्रांची संख्या बदलली तरी कथेचा आशय तोच रहातो. फक्त त्या बदलांवरून संबधित व्यक्ती, संबधित घटना, घटनेचे स्वरूप, सहभागी व्यक्ती व त्यांची संख्या, वीरगळाचा कालखंड, त्यामागील भूमिका, तत्कालीन व त्या व्यक्तीशी निगडीत आराध्य दैवत, पंथ, प्रवाह, वीराचा समूह, प्रथा–परंपरा इत्यादी गोष्टींतील बदल लक्षात येतो, वर्तविता येतो, इतकेच!

**वीरगळांचे प्रकार** – वीरगळाच्या निर्मितीमागील भावना एकच असली तरी भूमिका वेगवेगळी असू शकते. लढाईचा प्रकार, लढाईमागील, वीरमरणामागील कारण, कार्य, वीराने सामाजिक/राजकीय/ धार्मिक वा इतर योगदान, त्याचे सामाजिक/राजकीय/ धार्मिक/ प्रादेशिक वा आर्थिक स्थान यावरून वीरगळाचे अनेक प्रकार पडतात. उस्मानाबाद परिसरातही असे विविधतेने नटलेले वीरगळ पहावयास मिळतात, पण त्यात काही मोजक्याच प्रकारांचा अंतर्भाव होतो.

**वीरगळांचे प्रकार** –

- रचनेवरून – १. चार बाजूने कोरलेली वीरगळ (स्तंभ)
  २. समोरच्या बाजूने आयताकृती वीरगळ

- वीरगतीच्या कारणावरून प्रकार :–

१. गोधनरक्षण निदर्शक वीरगळ, २. पशुहल्ला निदर्शक
३. पशुधन निदर्शक/गोधन निदर्शक वीरगळ,
४. बलिदान निदर्शक वीरगळ, ५. आत्मबलिदान निदर्शक वीरगळ,
६. स्त्रीयोध्दा निदर्शक वीरगळ, ७. मातृस्मृती निदर्शक वीरगळ,
८. किल्ले निदर्शक वीरगळ, ९. व्याघ्रगळ,
१०. शिकार निदर्शक वीरगळ ११. व्यापार निदर्शक वीरगळ,
१२. लढाई निदर्शक वीरगळ–पायदळ, घोडदळ, हत्तीदळ, रथदळ, नौकादल

**उस्मानाबाद परिसरातील गोधन/गोधनरक्षणदर्शक वीरगळ** –

वरील प्रकारापैकी किल्ले निदर्शक, व्यापारनिदर्शक, आत्मबलिदान व बलिदान निदर्शक, स्त्रीयोध्दा निदर्शक वीरगळ, व्याघ्रगळ, नौकायुध्द निदर्शक वीरगळ उस्मानाबाद परिसरात सापडत नाहीत. (त्यातील उस्मानाबादला समुद्र किनारा नसल्याने नौकायुध्द निदर्शक वीरगळ अस्तित्वात नसाव्यात.) पण पशू किंवा गोधन निर्देशक वीरगळी येथे मोठया प्रमाणात सापडतात किंबहुना अशा प्रकारच्या वीरगळ प्रत्येक गावात आढळतात. त्याचे कारण येथील शेतीप्रधानता होय. वास्तविक प्राचीन काळापासून कृषी/शेतीआधारीत जीवन ही मानवाची ओळख राहिलेली आहे. भारत तर आजही कृषिप्रधान देशच म्हणविला जातो आणि महाराष्ट्रातील मराठवाडा हा आजही या कृषिव्यवस्थेला चिकटून आहे. त्यामुळे साधारणत १६ व्या शतकापासून ते १९ व्या

शतकापर्यंतच्या काळातील या परिसरातील वीरगळीमधील पशुनिदर्शकता त्याचेच द्योतक आहे. शेतीला उपयुक्त म्हणून गाय, बैल, म्हैस आणि शेतीपूरक व्यवसाय म्हणून गाय, बैल, खेचर, घोडे, कुत्री, म्हशी, कोंबडया, शेळया–मेंढया याचे पालन केले जाई.[१४] मराठवाडयात यादव कालखंडात विशेष भरभराट झाली. शेतीपूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसायाला मोठया प्रमाणात चालना मिळाली. त्यामुळे गोपालन वा गोसंवर्धनला महत्व प्राप्त झाले. तसेच हिंदू धर्मात प्राचीन काळापासून गाईला पूजनीय मानलेले असल्याने गोसंवर्धनास सर्वकालीन महत्व होतेच. त्यातच ती शेतीच्या मशागतीला आवश्यक असलेले बैल देणारी, दुध देणारी म्हणून मध्ययुगीन मानवी जीवनात तिला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. त्यामुळे पशुधन, गोधनाच्या चोरीचे प्रकारही पुढे आले. काही प्रमाणात पशुचौर्य हा व्यवसायही अस्तित्वात आला. अशावेळी या गोधनाचे रक्षण करताना मृत्युमुखी पडलेल्या वीराच्या स्मरणार्थ जी स्मारकशीळा अर्थात वीरगळ उभारली जाई तिला गोधनसंरक्षक वीरगळ म्हटले जाते.

गोधनरक्षक/ गोसंवर्धन निदर्शक वीरगळीमध्ये त्याच्या तळातील कप्प्यामध्ये २ ते ५ गाईंची /बैलांची मुखे, काहीवेळा पुर्ण गाई दाखविलेल्या असतात. त्याच्या समोर उभारलेला किंवा आडवा पडलेला वीरयोध्दा दाखविलेला असतो. काहीवेळा मोठा हल्ला असेल तर एकापेक्षा जास्त योध्दे वीरही दाखविलेले असतात. बाकी वरच्या कप्प्यात क्रमाने त्या वीरास स्वर्गात नेणाऱ्या अप्सरा, त्यावर स्वर्गात शिवलिंग, पुरोहित व पूजा करणारा वीर आणि सर्वात वर कलश दाखविलेले असते. थोडक्यात गावच्या पशुरक्षण/गोरक्षणासाठी वीरगती प्राप्त करणाऱ्यास मोक्ष, स्वर्गप्राप्ती होते.[१५] हा यामागील संदेश आहे. काही वेळा चोराऐवजी वन्य/हिंस्त्र पशुंपासून गोरक्षण/पशुरक्षण करतानाही गावातील व्यक्तीला वीरमरण प्राप्त होई. अशावेळी वीरगळामध्ये योध्दाच्या समोर वाघ, सिंह वा इतर पशु दाखविला जाई. अशाप्रकारच्या वीरगळांना जी.डी. सोनथायमर व के.शेट्टर यांनी 'तुरूगुल' असे म्हटले आहे.[१६]

सारांश :– सर्व पशू हे शेतकऱ्यांचे मित्र, आप्त, सहकारी असतात. त्यामुळे त्यांचे पालन–पोषण करण्याबरोबरच चोर, वन्य/हिंस्त्र पशूपासून रक्षण करणे हे शेतकऱ्यांसाठी महत्वाचे असे. शेतीपूरक पशूंची पूजा करण्याची प्रथा यातूनच पुढे आली. एवढेच नव्हे तर पशूसंवर्धन व रक्षणासाठी पूजा–अर्चा, होम हवन केल्याचेही उल्लेख मिळतात. उस्मानाबाद परिसरातील गोसंवर्धन निदर्शक, पशुसंरक्षण निदर्शक वीरगळ या समकालीन शेतीप्रधानता, शेतीप्रधान समाजजीवन आणि त्यादृष्टीने येथील समाजजीवनातील पशुधनाचे आर्थिक महत्व स्पष्ट करतात. गोसंवर्धन, पशुसंवर्धन आणि त्याच्याशी निगडीत अर्थव्यवस्थेचे चित्र स्पष्ट करतात.

संदर्भसूची :–

१) कुलकर्णी कृष्णाजी पांडूरंग– मराठी व्युत्पत्तीकोश–ढवळे केशव भिमाजी, मुंबई–१९४६– प्रथमावृत्ती– पृष्ठ क्र. ६६७
२) डॉ. जोशी प्रल्हाद नरहर– आदर्श मराठी शब्दकोश–विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे–१९९२–तृतीय आवृत्ती–पृष्ठ क्र. १९६.
३) महाराष्ट्र पुरातत्व वार्षिक अहवाल: अहवाल क्र. १ (२००३–४), संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचलनालय, मुंबई –२००९–प्रथमावृत्ती– पृष्ठ क्र. ७२
४) कित्ता
५) Dutts Shettar and G.D. Sontheimer (eds)-Memorial stone:a study of their origin, significane and veriety- institute on Indian Art History, Karnataka University, Dharwad, Page.2
६) ढिकसाळकर द.बा.–महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती– पुणे विद्यापीठ, पुणे

(प्रकाशन)— १९६४—पृष्ठ क्र. ७१

७) महादेवशास्त्री जोशी— भारतीय संस्कृतीकोश खंड ९— अनमोल प्रकाशन, पुणे २००१, पृष्ठ क्र. १९

८) माधव कानिटकर—महाभारत (स्त्री पर्व)—डायमंड पब्लीकेशन,पुणे—२००८ पृष्ठ क्र. २८

९) श्रीमद्भगवद्गीता—अध्याय ४ ज्ञानकर्मसन्यासयोग—३७— विकीपिडीया

१०) विजय आपटे— शोध महाराष्ट्राचा—राजहंस प्रकाशन, पुणे—२०१६, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. ६९

११) कित्ता

१२) संपादक स आ जोगळेकर—हाल सातवाहनाची गाथा सप्तशती—प्रसाद प्रकाशन,पुणे २०१३— चतुर्थ आवृत्ती, पृष्ठ क्र. ११७

१३) कित्ता—पृष्ठ क्र. ११७—११८

१४) श्री. अनिल दुधाणे—इतिहासाचे मूक साक्षीदार वीरगळ आणि सतीशिळा— मराठीदेशा फाऊंडेशन, पुणे २०२०, प्रथमावृत्ती— पृष्ठ क्र. ३३

१५) कित्ता— पृष्ठ क्र. ३४

१६) डॉ.संजय वाघमारे—सोलापूर जिल्ह्यातील वीरगळाची विविधता (पी.एच.डी शोधप्रबंध)—सोलापूर विद्यापीठ, सोलापूर—२०११—पृष्ठ क्र. १०